**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे - नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३१० / पुणे | सौ.सिंधू कल्याण ढोरे रा. १२३१, भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे-४२ | सहकारी अधिकारी श्रेणी-२, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे | चेअरमन, भवानी माता सहकारी गृहरचना संस्था, पुणे यांच्या विरूध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने | अपीलकर्त्याची मागणी ही कार्य-वाहीची आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही |
| २ | ११०२ / पुणे | श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले रा. तर्डोबाची-वाडी, ता. शिरूर, जि. पुणे | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता. दौंड, जि. पुणे | डॉ. माणिक संभाजी भंडगे यांच्या शिरूर येथील कार्यालया करिता दिलेल्या वीज कनेक्शनच्या अनुषंगाने माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याने हे अपील निकाली काढावे असे अपीलकर्त्याने दि.१७.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| ३ | ११८२ / पुणे | श्री. सुधीर श्रीधर केसकर रा. खामगाव - फाटा, ता. दौंड, जि. पुणे | जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता. दौंड, जि. पुणे यांचे कार्यालय | अपिलीय प्राधिकारी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., केडगाव, ता.दौंड जि. पुणे यांचे कार्यालय | नवीन वीज कनेक्शनच्या अनुषंगाने | माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ११५५ / पुणे | श्री. रामदास शिवाजी पिंगळे, रा. ढेकळवाढी, ता.बारामती, जि. पुणे | जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक मर्या., काटेवाडी, ता. बारामती, जि. पुणे | सरव्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक मर्या., जि. पुणे | सन २००६ ते २००७ या कालावधीत ग्रामपंचायत, ढेकळवाडी येथील शौचालयाच्या अनुषंगाने एकूण चार मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाली असल्याबद्दल अपीलकर्त्याने दि. १७.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ५ | १२६६ / पुणे | श्री. शेखर दत्तात्रय साळी, रा. वृंदावन हौ. सो. कॉम्प्लेक्स, सेक्टर डी, फ्लॅट नं.बी-१३, पौड रोड,कोथरूड पुणे-३८ | सहकारी अधिकारी श्रेणी-१, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे | सहकारी अधिकारी श्रेणी-१, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे | ऑडिटरने चुकीचे ऑडिट केल्याबद्दल चौकशीची मागणी | आवश्यक ती माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने निवेदनात नमू[illegible]ले आहे. |

वरील सर्व निष्कर्ष व उपलब्ध कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** २२.९.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदानंद शिवाजी कदम
२६/१, भारती अपार्टमेंट, तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे -५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
हवेली विभाग, पुणे ग्रामीण, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२४+१००१+१५५६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदानंद शिवाजी कदम
२६/१, भारती अपार्टमेंट, तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे -५

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
हवेली विभाग, पुणे ग्रामीण, पुणे श्री.रविंद्रसिंह एस.परदेशी

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३२४ | १६.४.२००७ | २६.५.२००७ | २८.५.२००७ | २६.६.२००७ |
| १००१ | | | | |
| १५५६ | २३.४.२००७ | २३.१२.२००७ | ३१.१०.२००७ | ३०.११.२००७ |
| ०८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>(माहितीचा कालावधी २००४ ते २००७)<br>गुन्ह्यातील आरोपी विश्वजित डंके यांना अटकपूर्व जामीन मिळाला, त्यांची पोलीस ठाण्यातील हजेरी, श्री.सदानंद कदम यांच्या विरुध्दच्या गुन्ह्याच्या तपासातील त्यांना वाटणाऱ्या त्रुटी याबाबातची माहिती. | | | |

## विवेचन

एका गुन्ह्यातील आरोपी विश्वजित डंके यांना अटकपूर्व जामीन, पोलीस ठाण्यातील हजेरी, आपल्या विरुध्दच्या गुन्ह्याच्या तपासातील आपल्याला वाटणाऱ्या त्रुटी या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.सदानंद शिवाजी कदम यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे यांच्याकडे मागितली होती. ही माहिती विविध अर्जाद्वारे गृहसचिवांपासून स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत अनेक ठिकाणी श्री.कदम यांनी मागितली असून वेळोवेळी ती त्यांना देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यानी व संबंधित अधिकाऱ्यांनी त्याना कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही तोच निर्णय कायम केला, तसेच काही बाबींची माहिती न्यायालयात दाखल असलेल्या गुन्ह्यामुळे नाकारली. त्याविरुध्द श्री.कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

श्री.कदम हे निवृत्त पोलीस अधिकारी असून त्यांचे वय ८१ वर्षे आहे. शेजारी शेजारी असलेल्या जागेच्या हद्दीवरुन श्री.कदम व श्री.डंके यांच्यात जवळजवळ १५ वर्षांपासून वाद होता. त्या संदर्भात उभयतांनी परस्परांविरुध्द न्यायालयात दावा व पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. या वादावरुन झालेल्या भांडणातून श्री.कदम यानी पिस्तुलातून आनंद बाबूराव डंके यांच्यावर गोळी झाडून

त्यांचा खून केला, असा गुन्हा हवेली पोलीस ठाण्यात दि.१०.२.२००४ रोजी नोंदविण्यात आला. श्री.आनंद डंके यांचा मुलगा विश्वजित डंके यांनी आपल्या डोक्यात दगड घालून खून करण्याचा प्रयत्न केला, म्हणून स्वसंरक्षणार्थ गोळी घातली, अशी फिर्याद श्री.कदम यांनी हवेली पोलीस ठाण्यात नोंदविली. दरम्यानच्या काळात श्री.विश्वजित डंके, सौ.शोभना अनपट हे फरार झाले होते. त्यानंतर त्यांनी अटकपूर्व जामीन आणला, या संदर्भातील हा विषय आहे.

आपल्याविरुध्द नोंदविलेल्या गुन्ह्याबाबत योग्य तपास झालेला नाही व अनेक बाबींची तपासणी केली गेलेली नाही, असे श्री.कदम यांचे म्हणणे आहे. या सदर्भात विविध पातळ्यांवर ते पत्रव्यवहार करीत आले आहेत. त्या त्या वेळी श्री.कदम यांना माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुणे ग्रामीण, पुणे श्री.रविंद्रसिंह परदेशी यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. श्री.कदम व श्री.डंके यांनी परस्परांविरुध्द नोंदविलेल्या गुन्ह्यातील विषयाचे दोषारोपपत्र न्यायालयात पाठविण्यात आले असून संबंधित कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहेत, असेही श्री.रविंद्रसिंह परदेशी यांनी नमूद केले. अपील क्र.१३२४ बाबत काही माहिती द्यावयाची राहिली होती, ती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी दिल्यानंतर त्यानुसार पूर्तता करण्यात आली, असे श्री.रविंद्रसिंह परदेशी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.विश्वजित डंके यांच्या पोलीस ठाण्यातील हजेरीचे कागदपत्र उपलब्ध नाहीत, असे उत्तर आधी आपल्याला दि.१९.५.२००७ रोजी देण्यात आले व नंतर संबंधित कागदपत्रे कालबाह्य झाल्यामुळे नष्ट करण्यात आल्याचे उत्तर देण्यात आले. हवेली पोलीस ठाण्याच्या अहवालात त्रुटी असल्याचे आपण नमूद केलयावर त्याबाबत परत पत्रव्यवहार करीत असल्याचे दि.८.१०.२००७ राजी आपल्याला कळविण्यात आले, असे श्री.कदम यांनी नमूद केले. आपल्यावरील गुन्ह्याच्या संदर्भात पंचनामा योग्य प्रकारे झाला नाही, तपासात जाणीवपूर्वक काही बाबींची दखल घेतली गेली नाही, अशा स्वरुपाचे आरोप श्री.कदम यांनी सर्व पत्रव्यवहारात केले आहेत. व त्या संदर्भात आदेश देण्याची मागणी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे. हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र मूळ अर्जानुसार श्री.कदम यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली गेली पाहिजे, तसेच द्यावयाची राहिलेली माहिती दि.५ मार्चपर्यंत द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार माहिती दिल्याचे श्री.रविंद्रसिंह परदेशी यांनी दि.३.३.२००८ च्या पत्रान्वये श्री.कदम यांना माहिती दिली असून त्याची प्रत आयोगाला सादर केली. मात्र आपल्याला काही कागदपत्रे मिळाली नसल्याची तक्रार श्री.कदम यांनी दि.५.३.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली असून मूळ अर्जात मागितलेल्या व्यतिरिक्तची माहिती अपिलात मागता येणार नाही, असे पूर्वीच स्पष्ट करण्यात आलेले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.८.९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हुसेन महंमद शेख
मशिदीसमोर, मु.पो.ता.आटपाडी, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६ / सांगली / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हुसेन महंमद शेख
मशिदीसमोर, मु.पो.ता.आटपाडी, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी सांगली प्रतिनिधी श्री.पराग सोमण

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.४.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.६.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.४.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>शासन परिपत्रक क्र.आरएएम-१०९०/२१०४/ल-६, दि.२७.१२.१९९० चे जमीन-नोंदी संदर्भातील परिपत्रकाची छायाप्रत. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.हुसेन महंमद शेख यांनी शासन परिपत्रकाची नक्कल मागणारा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केला होता. हे परिपत्रक उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द त्यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे अपील केले. विभागीय आयुक्तांनी ते जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे पाठविले. जिल्हाधिकारी सांगली यांनी अपील नामंजूर केले, त्याविरुध्द श्री.शेख यांनी लोकआयुक्तांकडे अपील केले. लोकआयुक्तांकडील पत्रानंतर श्री.शेख यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ निरसित झालेला असूनही आयोगाने हे अपील दाखल करुन घेतले.

दि.१८.३.२००८ रोजी पुणे येथे आयोगाने आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता अनुपस्थित असल्यामुळे निर्णय होऊ शकला नाही, म्हणून दि.१४.५.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री.शेख यांनी अर्जात नमूद केलेल्या परिपत्रकाचा विषय, क्रमांक व दिनांक स्पष्ट नसल्यामुळे नेमके कोणते परिपत्रक हवे आहे ते समजून येत नव्हते. तालुक्यामध्ये व जिल्हाधिकारी कार्यालयातही शोध घेतला. परंतु परिपत्रक मिळाले नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम अपिलातील निवेदनात सांगितल्याचे नमूद आहे. विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याचाच पुनरुच्चार आयोगापुढील सुनावणीत केला. मात्र अन्य व्यक्तीने केलेल्या मागणीनुसार या शासन परिपत्रकाची प्रत त्यांना देण्यात आली आहे, असे श्री.शेख यांनी संबंधित प्रतीसह नमूद केले. या

प्रतीची सत्यासत्यता पडताळून पहावी लागेल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी श्री.पराग सोमण यांनी केले. शासन परिपत्रकाची प्रत तालुक्यात अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात शोधण्याऐवजी संबंधित खात्याकडूनही मिळविता आली असती. अन्य व्यक्तीला दिले जाणारे परिपत्रक आपल्याला दिले जात नाही हा जाणीवपूर्वक माहिती टाळण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन श्री.शेख यांनी केले.

श्री.शेख यांच्या मूळ अर्जाला २३ दिवसांनी उत्तर दिल्याचे त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये १५ दिवस मुदत असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ३० दिवस मुदत असल्याने तो विलंब ठरत नाही. मात्र या कालावधीत पाच दिवस सार्वजनिक सुट्ट्या असल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीत जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे नमूद आहे. दि.२८.३.२००५ ते दि. १५.४.२००५ या काळात पाच दिवस नव्हे, तर तीन दिवस सार्वजनिक सुट्ट्या होत्या, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. यातील तपशिलाचा भाग वगळला तरी सार्वजनिक सुट्ट्या असल्यामुळे माहिती देता आले नाही, हे समर्थन मान्य करता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री.शेख यांनी परिपत्रकाचा पूर्ण तपशील दिला आहे. त्या आधारे हे परिपत्रक त्यांना उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांना शक्य होते. परंतु त्यांनी ते केलेले नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अप्पर चिटणीस श्री.एस.के.जाधव यांनी या संदर्भात चार दिवसात खुलासा आयोगाला सादर करावा असा आदेश विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेमार्फत आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता. तसा खुलासा आज दि.२२.९.१००८ पर्यंत श्री.सी.एम.जाधव यांनी सादर केलेला नाही. ही कृती कारवाईस पात्र ठरते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) माहिती देण्यासाठी पुरेसा प्रयत्न न करणे व पर्यायाने माहिती नाकारणे शास्तीस पात्र ठरते. सुनावणी दिनांकापासून आज दिनांक २२.९.२००८ पर्यंत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.के.जाधव, (सध्या मंडल अधिकारी शिरसी ता.शिराळा, जि.सांगली) यांनी खुलासा सादर केलेला नाही. हे लक्षात घेता माहिती नाकारण्याबद्दल त्यांना रुपये ५००० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती ऑक्टोबर महिन्यात मिळणाऱ्या सप्टेंबर महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.९.२००८**

सप्टेंबर-५३-५६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रतन सुखदेव कुंभार
मु.पो.बेवनूर, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत आवंढी, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७० / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि. १४.५.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.रतन सुखदेव कुंभार
मु.पो.बेवनूर, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, जत, जि.सांगली श्रीमती अरुणा दत्तात्रय ईटाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.४.२०६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ माहितीची मागणी**<br><br>सौ.सविता तानाजी कोडग यांनी ग्रामपंचायत, आवंढी यांना घरबांधणीबाबत मागितलेल्या परवानगीच्या अर्जाची सहीशिक्क्याची नक्कल. तसेच घराची नोंद झाल्यापासून प्रत्येक वर्षाचे आतापर्यंतचे उतारे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रतन सुखदेव कुंभार यांनी सौ.सविता तानाजी कोडग यांच्या घराच्या बांधकामाच्या संदर्भात सन १९९९ ते २००६ या काळातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आवंढी, ता.जत श्री.जी.एल.साळुंके यांनी त्यांना उत्तर पाठवून त्यांच्याकडूनच काही माहिती मागितली. सौ.सविता कोडग यांची ही खाजगी मालमत्ता असल्याने त्यांची परवानगी घेऊन अनामत रकमेसह व रुपये २५० शुल्क भरुन समक्ष भेटावे, असे श्री.साळुंखे यांनी श्री.कुंभार यांना कळविले. तसेच 'सरपंचांच्या नांवे पत्रव्यवहार करावा, म्हणजे आपणांस माहिती देणे योग्य होईल,' असेही कळविले. त्याविरुध्द श्री.कुंभार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही. आपण टपालाने माहिती मागविलेली असताना आपल्याकडूनच काही माहिती मागवून आपल्याला समक्ष भेटण्यास सांगणे, तसेच ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी असताना सरपंचांच्या नावे पत्रव्यवहार करण्यास सांगणे, अयोग्य असल्याचे नमूद करुन श्री.कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने प्रलंबित अपिलांच्या संदर्भात संबंधितांकडे विचारणा करणारा पत्रव्यवहार केला होता. 'आयोगाच्या दि.२७.९.२००७ च्या पत्राला अनुसरुन विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जत, जि.सांगली श्री.घारे यांना ग्रामपंचायत, आवंढी येथे समक्ष भेट घेऊन माहिती मागणीचा तपशील घेऊन श्री.कुंभार यांना माहिती देण्याच्या सूचना ग्रामसेवक श्री.साळुंखे यांना दि.४.१०.२००७ रोजी दिल्या. त्यानुसार श्री.साळुंखे यांनी दि.१९.१०.२००७ रोजी माहिती दिली,' असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१८.३.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात नमूद केले. मात्र आपला मूळ अर्ज दि.१७.४.२००६ चा होता व माहिती दि.१९.१०.२००७ रोजी मिळाली आहे, तीही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. दरम्यानच्या काळात आपल्या वडिलार्जित मालकीच्या जमिनीवर ग्रामसेवक श्री.साळुंखे यांच्या मदतीने

अतिक्रमण झाले असून आपल्याला उद्ध्वस्त केले गेले आहे, असे श्री.कुंभार यांनी त्यावेळच्या निवेदनात व नंतरही आयोगाला सादर केलेल्या सविस्तर निवेदनात नमूद केले आहे. सौ.कोडग यांनी बांधकाम केलेली जागा आपल्या मालकीची असून ग्रामसेवक श्री.साळुंखे यांच्या मदतीने अतिक्रमण केले गेले आहे. गावठाण हद्दीतील या जमिनीवर त्यांचे नावही मालमत्ता नोंदवहीवर खाडाखोड करुन लावलेले आहे. याबाबत पोलिसांकडूनही आपल्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही. माहिती अचूक व वेळेत मिळाली असती तर आपल्याला न्यायालयात दाद मागता आली असती, परंतु तसे न झाल्यामुळे आपल्याला मानसिक त्रास व आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. आपली जागा असूनही आपल्याला बेघर होण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन श्री.कुंभार यांनी निवेदनामध्ये केले आहे. दि.१४.५.२००८ रोजी आयोगापुढील सुनावणीतही अपीलकर्ता यांच्या वतीने त्यांचे बंधू श्री.डी.एस.कुंभार यांनी लेखी व तोंडी तेच नमूद केले.

श्री.कुंभार यांना माहिती देण्यास विलंब झालेला नाही. कळविलेले शुल्क त्यांनी न भरल्यामुळे माहिती दिली नाही. नंतर गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे दि.१९.१०.२००७ रोजी माहिती दिली, असे श्री.साळुंखे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद केले आहे. श्री.कुंभार यांचा दि.२९.४.२००६ चा अपील अर्ज आपल्या कार्यालयात आढळून येत नाही] असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, जत, जि.सांगली श्रीमती अरुणा ईटाई यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. आयोगापुढील सुनावणीला ग्रामसेवक श्री.साळुंखे कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गैरहजर होते, त्यांच्या अनुपस्थितीबद्दल गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत श्रीमती अरुणा ईटाई काहीही सांगू शकल्या नाहीत. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्रीमती सुषमा देसाई यांच्या काळातील हे अपील असून आयोगाकडून विचारणा झाल्यानंतर कार्यवाही करुन श्री.कुंभार यांना माहिती देण्यात आली, असेही श्रीमती ईटाई यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

ग्रामसेवक श्री.साळुंखे यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. विषयाचा संदर्भ लक्षात घेता सौ.कोडग यांची परवानगी आणण्याचा व १)अनामत, २)संकीर्ण अनामत, ब)इतर अनामत,

क)संकीर्ण, ड) संकीर्ण अशा माहितीसह अपीलकर्त्याला हजर राहण्यास सांगण्याचा त्यांचा निर्णय योग्य नाही, कळविलेले शुल्कही अवास्तव आहे. मूळ अर्ज मिळाल्यापासून दीड वर्षाने व तेही आयोगाने विचारणा केल्यानंतर त्यांनी माहिती दिली, व तीही अपूर्ण दिली. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात, याची जाणीव अपिलीय प्राधिकारी श्रीमती ईटाई यांनी ग्रामसेवक श्री.साळुंखे यांना द्यावी. अपीलकर्त्याचा सुनावणीस येण्याजाण्याचा प्रवासखर्च (१००रुपये) श्री.साळुंखे यांनी द्यावा व सुनावणीस गैरहजर राहिल्याबाबतचा त्यांचा लेखी खुलासा अपिलीय प्राधिकारी यांनी मागवून आठ दिवसात आयोगाला सादर करावा, तसेच तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्रीमती सुषमा देसाई (सध्या गटविकास अधिकारी, हातकणंगले) यांनी अपिलाच्या हाताळणीबाबत आयोगाकडे खुलासा पाठविण्याची सूचना त्यांना कळवावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत श्रीमती ईटाई यांना दिले होते.

श्रीमती ईटाई यांनी श्री.साळुंखे यांना दि.१५.५.२००८ रोजी व श्रीमती देसाई यांना दि.२६.५.२००८ रोजी आयोगाचे आदेश कळविले. श्री.साळुंखे यांना पाठविलेल्या पत्रात 'झालेल्या चुका दुरुस्त करणारे पत्र' श्रीमती ईटाई यांनी दि.५.६.२००८ रोजी पाठविले. श्रीमती ईटाई यानी दि.७.७.२००८ रोजी पाठविलेले पत्र आपल्याला दि.१४.७.२००८ रोजी मिळाल्याचे श्रीमती देसाई यांनी श्रीमती ईटाई यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. 'श्री.कुंभार यांचे अपील दि.१.५.२००६ रोजी पंचायत समिती, जतकडे प्राप्त झाले. दि.३.६.२००६ रोजी बदली झाल्यामुळे आपण तेथील कारभारातून मुक्त झालो. या मुदतीत संबंधित लिपिकाकडून अपील निर्गतीबाबत कोणतीच कार्यवाही केली गेली नाही. तसेच आपण कार्यमुक्त झाल्यानंतरही अपील निर्गत करण्याचा कालावधी शिल्लक असूनही अपील निर्गत झालेले नाही. माहिती देण्यास झालेल्या विलंबास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवकच जबाबदार आहेत,' असे श्रीमती देसाई यांनी दि.१.८.२००८ रोजीच्या या पत्रात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी श्री.साळुंखे यांनी दि.११.६.२००८ रोजी खुलासा पाठविला. प्रापंचिक अडचणीमुळे आपण सुनावणीच्या दिवशी उपस्थित राहू शकलो नाही. शुल्क न भरल्यामुळे श्री.कुंभार यांना माहिती दिली नाही. शुल्क भरले असते तर माहिती देता आली असती अथवा टपालाने पाठविता आली असती, असे श्री.साळुंखे यांनी खुलाशात म्हटले आहे. अपीलकर्त्यास प्रवासखर्च दिल्याची पोहोच अलाहिदा सादर करीत आहे, असेही श्री. साळुंखे यांनी या खुलासापत्रात म्हटले आहे, मात्र आज दि.२२.९.२००८ पर्यंत अशी पोहोच त्यांनी सादर केलेली नाही.

उभय बाजूंची सर्व निवेदने व सादर करण्यात आलेली एकूण कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत :

(१) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.जी.एल.साळुंखे यांनी माहिती विलंबाने व अपूर्ण दिली आहे. तसेच ती टाळण्याचाच प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

(२) श्री.साळुंखे यांनी माहिती वेळेत न दिल्यामुळे आपले मोठे नुकसान झाले आहे या अपीलकर्ता श्री.रतन सुखदेव कुंभार यांच्या निवेदनाला पुष्टी मिळते. त्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देणे योग्य ठरते.

(३) श्रीमती अरुणा ईटाई यांनी पत्रव्यवहाराबाबत तत्परता दर्शविलेली नाही. तसेच श्रीमती सुषमा देसाई यांनी अपिलाची दखल न घेण्याबाबत लिपिकावर जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

(४) श्रीमती देसाई यांनी आयोगाकडे खुलासा न पाठविता श्रीमती ईटाई याना पाठविलेल्या पत्राची प्रत खुलासा म्हणून आयोगाकडे पाठविली आहे. ही कृती; तसेच 'जन माहिती अधिकारी यांना नोटीस न देता अपिलीय अधिकाऱ्यास आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माझेविरुध्द कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत

खुलासा सादर करण्याबाबत कळविले आहे, हे योग्य वाटत नाही,' अशा स्वरुपाची पत्रातील भाषाही योग्य नाही.

(५) प्रथम अपिलाच्या निर्गतीसाठी ३० दिवसांचीच मुदत असून अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवस मान्य केलेले आहेत. त्यातील ३३ दिवस श्रीमती देसाई अपिलीय प्राधिकारी पदावर होत्या. श्रीमती ईटाई यांनी केलेली कार्यवाही एक वर्षानंतर व तीही आयोगाच्या विचारणेनुसार केलेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) ग्रामसेवक श्री.साळुंखे यांना २५००० रुपये शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती ऑक्टोबर महिन्यापासून मिळणाऱ्या पुढील महिन्यांच्या त्यांच्या वेतनातून पाच हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची राहील.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी या कागदपत्रांच्या अनुषंगाने मूळ दस्ताबाबत व मूळ कागदपत्रात खाडाखोड करुन माहिती बदलली गेली आहे का, याच्या वस्तुस्थितीबाबत चौकशी करुन तसे आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी व त्याचा अहवाल

आयोगाला सादर करावा. चौकशीची प्रक्रिया एक महिन्यात पूर्ण करुन त्यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल आयोगाला सादर करावा.

(४) अपीलकर्ता श्री.रतन सुखदेव कुंभार यांना प्रतिकात्मक नुकसानभरपाई म्हणून रुपये ५०००/- व सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशानुसार प्रवासखर्चापोटी रुपये १०० आदा करुन ग्रामसेवक श्री.साळुंखे यांनी दि.१०.१०.२००८ पर्यंत त्याची पोहोच आयोगाला सादर करावी.

(५) निष्कर्षातील क्र.३ मध्ये नमूद केलेली कृती अयोग्य असल्याची समज श्रीमती ईटाई व श्रीमती देसाई यांना देण्यात येत आहे.

(६) श्रीमती देसाई व श्रीमती ईटाई या दोन्ही अधिकाऱ्यांनी अपिलाबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही, हे निष्कर्ष क्र.५ मध्ये स्पष्ट दिसते. याची पुनरावृत्ती झाल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२२.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. सईद राझा बर्नी, **अपीलकर्ता**
डी / ३, अमर क्लासिक,
हडपसर, जि.पुणे -४११ ०२८

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी **उत्तरवादी**
हवेली विभाग, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी,
हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७९ |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.-- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०१.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | लाचलुचपत प्रतिबंधक न्यायाधिकरण यांच्या कार्यवाहीमुळे तहसील हवेली येथील पोलीस कोठडीत असलेले निलंबित असलेले विभागीय चौकशी सुरु असलेल्या तलाठी, व मंडल अधिकारी यांची माहिती मागितली होती. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सईद राझा बर्नी यांनी लाचलुचपत प्रतिबंधात्मक केंद्र यांच्यामुळे तहसील, हवेली येथील पोलीस कोठडीत असलेले निलंबित विभागीय चौकशी सुरु असलेले तलाठी व मंडळ अधिकारी यांची माहिती मागितली होती.

सदर माहिती न मिळाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले होते दरम्यानच्या काळात आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.३०.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १६/०९/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील
'दत्तप्रसाद', आवटी पाटील मळा,
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
मोहनराव शिंदे सह.साखर कारखाना लि.,
मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक संचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८+१७६ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील
'दत्तप्रसाद', आवटी पाटील मळा,
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
मोहनराव शिंदे सह.साखर कारखाना लि.,
मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली श्री.डी.एस.साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक संचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.सूर्यकांत भिमराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००६ (अ.क्र.१७६)<br>दि.५.६.२००६ (अ.क्र.१७८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.५.२००६ (अ.क्र.१७६)<br>दि.१.७.२००६ (अ.क्र.१७८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.६.२००६ (अ.क्र.१७६)<br>दि.११.७.२००६ (अ.क्र.१७८) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.६.२००६ (अ.क्र.१७६)<br>दि.३०.८.२००६ (अ.क्र.१७८) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना व श्री रेणुका शुगर्स लि.बेळगावशी साखर कारखाना भाडे तत्त्वावर चालविणेस देण्यासंदर्भात दि.१ मे २००५ ते १७ मे २००६ या काळातील-

(१) भाडे तत्त्वावर चालविण्यासाठी आलेल्या सर्व टेंडर्सचा तुलनात्मक तक्ता व रेणुका शुगर्सच्या टेंडर्सच्या छायांकित प्रती.

(२) संचालक मंडळाच्या बोलाविलेल्या मिटिंगच्या(नोटिस) अजेंडाची छायांकित प्रत व सदर मिटिंगचे प्रोसिडिंगच्या छायांकित प्रती.

(३) जनरल मिटिंगचा अजेंडा व मिटिंगचे प्रोसिडिंगच्या छायांकित प्रती.

(४) रेणुका शुगर्स लि.च्या डिस्टलरी प्रकल्पासाठी मोहनराव शिंदे सह.साखर कारखान्याच्या जागेबाबत(गटनंबरसह)केलेल्या संमती व पत्रव्यवहार यांच्या प्रती

(५) मोहनराव शिंदे सह.साखर कारखाना व श्री.एस.एस.इंजिनिअर्स, पुणे यांच्यामधील साखर निर्मिती व को.जनरेशन मशीनरी पुरवठा व उभारणी संदर्भातील जे करार झाले त्याच्या छायांकित प्रती. कारखाना उभारणी व इतर संलग्न सिव्हिल कॉन्ट्रॅक्ट कामाच्या निविदा व कामाच्या ऑर्डर्स यांच्या नियम अटीसह स्वतंत्र प्रती व प्रतिभा कन्स्ट्रक्शन,कोल्हापूर व इतर यांच्याशी केलेले करारपत्राच्या छायांकित प्रती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील यांनी मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली यांच्या संदर्भात विविध स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक यांच्याकडे मागितली होती. मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना व श्री रेणुका शुगर्स लि.यांच्यामधील करार, निविदांचा तुलनात्मक तक्ता इ. माहितीचा त्यात समावेश होता. संबंधित माहितीबाबतचे शुल्क जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना विहित मुदतीत कळविले. परंतु माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.आवटी पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले, परंतु प्रतिभा कन्स्ट्रक्शन्स, कोल्हापूर व एस.एस.इंजिनिअर्स, पुणे या त्रयस्थ पक्षांशी संबंधित माहिती त्यांच्या व्यावसायिक हितसंबंधाला बाधा पोहोचण्याची शक्यता असल्याने त्यांनी आक्षेप घेतल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हा निर्णय मान्य केला. त्याविरुध्द श्री.आवटी पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आयोगाने दि.१८.३.२००८ रोजी पुणे येथे घेतलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. श्री.आवटी पाटील यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी त्यावेळी नमूद केले. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही, असे प्रतिपादन श्री.आवटी पाटील यांनी केले. दि.१४.५.२००८ रोजी सांगली येथे या अपिलांची सुनावणी आयोगाने घेतली. राहिलेली माहिती तयार असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली यांनी त्यावेळी स्पष्ट केले, मात्र सर्व कामांबाबत कारखान्याच्या सिव्हिल इंजिनिअरनी दिलेल्या अहवालांच्या प्रती अशा स्वरुपाची

विस्तृत माहितीची मागणी अपीलकर्ते सातत्याने करीत असतात, तसेच कारखान्याविरुध्द प्रचार व बदनामी यासाठी या माहितीचा वापर केला जातो, असे श्री.सूर्यकांत भिमराव पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले. आयोगाच्या आदेशानुसार सर्व संबंधित पत्रव्यवहार त्यांनी दि.२०.५.२००८ रोजी सादर केला.

एस.एस.इंजिनिअर्स व प्रतिभा कन्स्ट्रक्शन्स यांच्याबरोबरचे करार व त्यांना दिलेल्या ऑर्डर्स यांच्या प्रती व्यावसायिक गुपितासंबंधीच्या कारणावरुन नाकारण्यात आल्या असल्याचे श्री.सूर्यकांत भिमराव पाटील यांनी संबंधित त्रयस्थ पक्षांच्या पत्रांसह नमूद केले. विविध वृत्तपत्रांमध्ये मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना व रेणुका शुगर्स लि.चा मद्यार्क निर्मिती प्रकल्प या संदर्भात प्रसिध्द झालेल्या प्रतिकूल मजकुराची कात्रणे श्री.सूर्यकांत भिमराव पाटील यांनी सादर केली, तसेच श्री.आवटी पाटील कारखान्यास त्रास देण्याच्या व बदनामी करण्याच्या उद्देशाने माहिती मागून विपर्यस्त स्वरुपात तिचा वापर करतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांचा हा आक्षेप रास्त असल्याचे विद्यमान व तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लेखी व तोंडी नमूद केले. प्रथम अपिलाच्या दरम्यानही कारखान्याच्या वतीने हेच प्रतिपादन करण्यात आले होते. तसेच एस.एस.इंजिनिअर्स व प्रतिभा कन्स्ट्रक्शन्स यांच्याबाबतची माहिती न देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे योग्य आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.डी.एस.साळुंखे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.एस.बी.थोरात यांनी केले. अशा प्रकारांमुळे कारखान्याच्या हितसंबंधाला व श्री रेणुका शुगर्सबरोबरच्या भाडेतत्त्वाच्या कराराला बाधा पोचली असल्याचेही श्री.सूर्यकांत भिमराव पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे. वृत्तपत्रांना आपण माहिती पुरविलेली नाही, असे श्री.आवटी पाटील यांनी नमूद केले.

श्री.आवटी पाटील यांना कारखान्याने माहिती दिली आहे. मात्र प्रतिभा कन्स्ट्रक्शन्स व एस.एस. इंजिनिअर्स यांच्याबरोबर झालेल्या करारासंबंधीची काही माहिती व्यावसायिक गुपितांच्या कारणावरुन त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांनी नोंदविलेल्या हरकतीनुसार नाकारली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचा हा निर्णय ग्राह्य मानला आहे. वस्तुत: साखर कारखान्यासारख्या सार्वजनिक

महत्त्वाच्या संस्थेचे करार हजारो नागरिकांशी संबंधित असल्यामुळे व्यापक जनहिताचे ठरतात. अशी माहिती जनतेला मिळणे आवश्यक असल्यामुळे व्यावसायिक गुपितांचा मुद्दा त्यात मान्य करता येणार नाही. परंतु या विशिष्ट अपिलांच्या संदर्भातील उभय बाजूंची निवेदने, सादर करण्यात आलेली कागदपत्रे व अपिलीय प्राधिकाऱ्यांचा अभिप्राय यांचा विचार करता जन माहिती अधिकाऱ्यांनी ती माहिती न देणे योग्य ठरते. मात्र हा सर्वसाधारण नियम होऊ शकत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.९.२००८**

सप्टेंबर-३८-४२

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ.क्र. | अपील क्रमांक | १९१ + १९३ + ५२३ + ५२४+ १३४ + १३५ / सोलापूर |
|---|---|---|
| १ | अपीलकर्ता | श्री. श्री. विलास बब्रुबान शिंदे<br>मु.पो.जंगले गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि.सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकारी | उप अभियंता, जिल्हा परिषद, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर |

| अपील क्रमांक | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|
| १९१ + १९३ / सोलापूर | सन २००० ते सन २००६ या कालावधीत काटेगाव बांगरवाडी या गावाच्या रस्त्याची दुरूस्तीच्या अनुषंगाने कामाचे अंदाजपत्रक, निविदा कामाची मोजमापे, हजेरीपट व देयक अदा झालेल्या मोजमाप पुस्तकाच्या छायांकित प्रती |
| ५२३ + ५२४ / सोलापूर | सन १९९७ ते २००१ या कालावधीत बार्शी उपविभागातील शेंद्री या ग्रामपंचायतीस मंजूर कामाच्या अनुषंगाने माहिती व सन २००२-२००३ या कालावधीत मौजे उंडेगाव ते एम.डी.आर. नं.२३ दुरूस्तीबाबत अंदाजपत्रक, निविदा व एम.बी. च्या बीलांच्या छायांकित प्रती |
| १३४ / सोलापूर | सन २००१ ते २००२ व सन २००५ ते २००६ या कालावधीत झालेल्या कामाचे अंदाजपत्रक, निविदा कामाची मोजमापे व देयक नक्कल मिळणेबाबत |
| १३५ / सोलापूर | उंडेगाव ते एम.डी.आर २३ ला जोडणाऱ्या रस्त्याची व तुर्कपिंपरी जोड रस्त्याची माहिती |

माहिती प्राप्त झाल्याने कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. २.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २५.९.२००८**

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

सप्टें.०८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला.
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२ / सातारा | |
| २ | अपीलकर्ता | श्रीरंग आनंदा माने रा. हिंगणे रोड, भवानीनगर, वडूज, ता. खटाव जि. सातारा | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, वडूज, ता. खटाव, जि सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसिलदार खटाव, ता. खटाव, जि. सातारा | हजर |
| ५ | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांचे पत्र क्र.जमीन/बिनशेती/कावि/२१६/०७/फलटण दि. ५.३.२००७ नुसार श्रीमती द्वारकाबाई वामन अर्जुन, रा. पिंगळी बु. ता. माण, यांचा जबाब प्रकरणी सामील नाही. सदर जबाबाची नक्कल मिळणेबाबत | |

मागणी केलेली प्रत धारिकेमध्ये उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. तसेच मूळ धारिकेमध्ये पान नं. १ ते १४५ असून त्यामध्ये श्रीमती द्वारकाबाई वामन अर्जुन यांचा जबाब असलेचा आढळून येत नाही, असेही नमूद केले आहे व त्याप्रमाणे अपीलकर्त्यास कळविले आहे. जबाब प्रत्यक्षात दिलेला नसताना जबाब दिल्याचे तहसीलदार, वडूज यांनी दाखविले असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांनी श्रीमती द्वारकाबाई वामन अर्जुन यांच्या जबाबासंदर्भातील वस्तुस्थितीची चौकशी करून अपीलकर्त्यास दि. ६.१०.२००८ पर्यंत माहिती द्यावी. त्याबाबतचा अनुपालन अहवाल दि. १०.१०.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.९.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ